05

# जाहीर लिलाव सूचना

म.प्रा.प्र वणी रंभापूर येथील अन्वी व पैलपाडा विभागातील तलावाचे मासेमारी हक्क देण्यासाठी सन२०२४-२५ व २०२५ – २६ या दोन वर्षाच्या कलावधिकारिता मासेमारी पालन हक्क देण्यासाठी दिनांक १७/९/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.०० वा. जाहीर लिलाव करण्यात येईल तरी इछुक व्यक्तींनी लिलावाच्या दिलेल्या वेळेवर हजार राहावे. लिलावात बोली बोलणाऱ्या इछुक व्यक्तींनी अग्रिम रक्कम रु १००००/- भरावी लागेल, लिलावाच्या अटी व शर्ती म.प्रा.प्र वणी रंभापूर कार्यालय कामकाजाच्या वेळी पाहावयास मिळतील.

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
म.प्रा.प्र. रंभापूर

**जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे**

१. जाहीर लिलाव ठरलेल्या ठिकाणी, तारखेस व वेळेवर होईल.

२. लिलावात बोली बोलण्यास रु १०,०००/- अग्रिम रक्कम जमा करावी लागेल अन्यथा बोली बोलता येणार नाही.

३. ज्या लिलाव धारकांनी मासेमारी हक्क पालना करीता तलाव घेतला असेल त्यांच्या लिलावच्या रकमेत अग्रिम रक्कम रु १००००/-वळती करण्यात येईल व इतरांची रक्कम त्याच ठिकाणी परत करण्यात येईल.

४. तलाव लीलावाची बोली संपताच, लीलाव रक्कम भरणा तात्काळ करावा लागेल. अन्यथा अग्रिम रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच लिलाव तलावाचे हक्क मा.मुख्य बिजोत्पादन अधिकारी, म.प्रा.प्र.वणी (रं) याचे कडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

५. दिनांक३०/०९/२०२६ पर्यंतच मासेमारी पालनाचे हक्क राहील त्यानंतर कोणताही हक्क सांगता येणार नाही.

६. तलावास योग्य किमत न मिळाल्यास लिलाव रद्द करण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा अधिकार समितीस राहील.

७. सदर तलाव सपूर्णता नैसर्गिक पाण्यावर अवलंबून आहे. जाहिर लिलावाच्या दिवशी तलावात जेवढे पाणी जमा झाले आहे त्या शिवाय कार्यालया तर्फे पाण्याची पातळी वाढविणे करिता कोणत्याही प्रकारचा पाणी पुरवठा करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

८. तलावाचे संपूर्ण संरक्षण तलाव घेणाऱ्या लिलाव धारकास स्वता करावे लागेल व परिसरातील अवगमनास अडथळा होणार नाही ही दक्षता घ्यावी लागेल.

९. लिलाव झालेल्या तलावाचा कालावधी सप्टेंबर २०२४ ते सप्टेंबर २०२६ राहील त्या दरम्यानच्या कालावधीत २४ तास चौकीदार ठेवणे अनिवार्य राहील.

१०. लिलाव धारकास तलाव मासेमारी पालन हक्का करिता देण्यात आलेला आहे त्यांनी तलावावर २४ तास चोकीदार न ठेवल्याचे निदर्शनास आल्यास न कळविता करार रद्द करणयाचे अधिकार मा. मुख्य बिजोत्पादन अधिकारी, म.प्रा.प्र.वणी (रं) याचे कडे राखून ठेवण्यात आले आहे

११. मासेमारी पालन हक्क लिलाव धारक यांचे संबधीत तलावा कार्यक्षत्रात कोणत्याही प्रकारची दुर्घटना झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मासेमारी पालना करीता तलाव घेणाऱ्या धारकाची राहील त्यास संबधीत प्रक्षेत्राचे अधिकारी/ म.प्रा.प्र.वणी (रं) कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१२. सिंचना करीता प्रक्षेत्रा वर वेळोवेळी पाण्याचा वापर पिकाकरीता केल्या जाणार आहे त्यामुळे पाण्याची पातळी कमी झाल्यास त्याबद्दल तक्रार करता येणार नाही.

१३. तलावातील मासेमारी संदर्भातील योग्य उपाय योजना तलाव लिलाव घेणाऱ्या धारकाची राहील त्यासंदर्भात विभागाचे प्रभारी अधिकारी यांची जबाबदारी राहणार नाही.

१४. वरील अटीचे उल्लंघण झाल्यास समिति एकतर्फी निर्णय घेऊन मूक्त होईल.

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र
वणी रंभापूर

Officer In Charge, Agricultural Research Station, ... Dr. P.D.K.V. Akola
Inward No. 340
Dt. 9/9/2024